Impact Factor 4.574

ISSN 2349-638x

Refereed And Indexed Journal

# AAYUSHI INTERNATIONAL INTERDISCIPLINARY RESEARCH JOURNAL (AIIRJ)

Monthly Journal

VOL-V ISSUE-V May 2018

Address
- Vikram Nagar, Boudhi Chouk, Latur.
- Tq. Latur, Dis. Latur 413512 (MS.)
- (+91) 9922455749, (+91) 8999250451

Email
- aiirjpramod@gmail.com
- aayushijournal@gmail.com

Website
- www.aiirjournal.com

CHIEF EDITOR – PRAMOD PRAKASHRAO TANDALE

# गडचिरोली जिल्ह्यातील आदिम (माडिया) जमातीचे कौटुंबिक व आर्थिक घटकांचे अध्ययन

**प्रा. प्रमोद स. घोनमोडे**
राजे विश्वेश्वरराव कला – वाणिज्य महाविद्यालय,
भामरागड, जि. गडचिरोली

**डॉ. एस. एन. बुटे**
प्राचार्य,
भगवंतराव कला – विज्ञान महाविद्यालय,
ता. एटापल्ली जि. गडचिरोली

## १.० प्रस्तावना

जगातील सर्व देशांत, निरनिराळ्या प्रदेशात आदिवासी समुहाची वस्ती आहे. विषेशत: आशिया, आफ्रिका आणि अमेरिका या खंडातील देशात आजही आदिवासी जमात मोठ्या प्रमाणात आढळते. आज भारत स्वतंत्र होऊन सात दशके पूर्ण झालीत, भारतामध्ये विभिन्न जाती – जमाती व धर्माचे लोक वास्तव्य करीत असून भारतीय शासन व्यवस्थेने धर्मनिरपेक्षतेचा स्विकार केला असल्यामुळे प्रत्येक व्यक्तीलाही आपल्या धर्माचा प्रचार व प्रसार करण्याचा अधिकार मिळालेला आहे. याप्रमाणे येथील समाज व्यवस्थेमध्ये असलेल्या जाती–जमातीचा विकास करण्याकरिता शासन भर देत असले तरी काही जमातीचा विकास अजुनही पुरेशा प्रमाणात झाला नसल्याचे दिसून येते. त्यामुळे आज अशा काही जमाती (जसे माडिया जमात) आहेत की, त्यांना समाजातील मुख्य प्रवाहात येण्याकरिता अडचणी निर्माण होत आहे. भारतातील आदिवासी समाज हा विकासापासून खुप दूर आहे. दऱ्या खोऱ्यात राहणारा आदिवासी समाज आधुनिक समाजाच्या संपर्कात आल्याने अनेक समस्यांनी ग्रासला आहे. स्वातंत्र्य प्राप्तीच्या ७० वर्षानंतरही आदिवासींचे सामाजिक आर्थिक, शैक्षणिक जिवनात पाहिजे त्या प्रमाणात सुधारणा झालेल्या दिसून आल्या नाही.

आदिवासी जमातीतील गोंडाच्या ज्या उपजमाती आहेत. त्यापैकी माडिया किंवा माल्हिया जमात होय. ही जमात बस्तरमधील नारायणपूर व जगदलपूर या परिसरातील घनदाट असण्यात राहते. महाराष्ट्रात ही जमात प्रामुख्याने चंद्रपुर व गडचिरोली जिल्ह्यातील सिरोंचा, भामरागड, एटापल्ली, अहेरी, धानोरा मूलचेरा या तालुक्यात प्रामुख्याने आढळून येते. साधारणत: माडिया ही जमात समाजातील इतर समुहांमध्ये मिसळतांना आढळून येत नाही. एटापल्ली व भामरागड या दोन तालुक्यांमध्ये यांचे वास्तव्य मोठ्या प्रमाणात असून दोन आदिवासी विकास खंडामधील अरण्यात ते अनेक वर्षापासून वास्तव्यास आहे. या जमातीचे वर्गीकरण अतिमागास जमात म्हणून करण्यात आलेले असून आर्थिक, सामाजिक दृष्ट्या ही जमात अतिशय मागासलेली आहे. महाराष्ट्रात माडिया, कोलाम, कातकारी तीन जमाती अतिमागास मानण्यात आल्या असून आदिम जमाती म्हणून केंद्रशासनाच्या सूचित निर्देशीत आहे त्यापैकी कातकरी ही जमात केवळ आर्थिक दृष्टीकोनातून अतिमागास आहेत. त्यामुळे त्यांच्या आर्थिक व सामाजिक स्थितीत अंशत: परिवर्तन होत आहे, हे परिवर्तन कशा पद्धतीने होत आहे, त्यामध्ये त्यांना कोणत्या अडचणी निर्माण होत आहेत. याकरिता गडचिरोली जिल्ह्यातील आदिम जमातीच्या (माडिया) कौटुंबिक व आर्थिक घटकांचा अभ्यास करण्यात आला आहे.

## २.० संशोधन पद्धती

प्रस्तुत संशोधनात गडचिरोली जिल्ह्यातील माडिया (आदिम) जमातीच्या लोकांचा आर्थिक व सामाजिक स्थितीचे अध्ययन करावयाचे असल्याने सामाजिक सर्वेक्षण पध्दतीची निवड केलेली आहे.

### २.१ अध्ययन विश्व, जनसंख्या, न्यादर्श व संशोधन आराखडा

संशोधनामध्ये वस्तुनिष्ठ स्वरूपात माहिती गोळा करण्यासाठी गडचिरोली जिल्ह्यातील ६ तालुक्यांचा समावेश प्रस्तुत अध्ययनात करण्यात आला आहे जे या संशोधनकार्यातील अध्ययन विश्व आहे. न्यादर्श संपूर्ण जनसंख्येचा (गडचिरोली जिल्ह्यातील आदिम जमाती – माडीया जमातीतील व्यक्ती) एक भाग आहे. प्रस्तुत संशोधनकार्यात संभाव्यता पद्धतीतील साधा यादृच्छिक नमुना पद्धतीने नमुना निवडण्यात आला आहे. संशोधनाकरीता गडचिरोली जिल्ह्याची निवड केली असून या जिल्ह्यात १२ तालुके आणि १६८९ गावांपैकी ज्या तालुक्यात आदिम जमाती (माडीया) चे वास्तव्य

बहुतांश प्रमाण आहे. अशा एटापल्ली, अहेरी, भामरागड, सिरोंचा, मुलचेरा व धानोरा या सहा तालुक्यांची निवड करण्यात आली. या सहा तालुक्यातील आदिम जमातीतील (माडिया) एकूण ७०० लोकांची न्यादर्श म्हणुन निवड करण्यात आली. प्रस्तुत संशोधनात वर्णनात्मक संशोधन आराखड्याची निवड करण्यात आली आहे.

**२.२ तथ्य संकलन**

प्रस्तुत संशोधनात प्राथमिक व दुय्यम स्त्रोतामधून माहिती प्राप्त करण्यात आली. प्रत्यक्ष माहितीच्या संकलनासाठी अनुसूची पध्दत, मुलाखत तंत्र, निरीक्षण आणि सर्वेक्षण पध्दतीचा उपयोग करण्यात आला.

**२.३ माहितीचे सांख्यिकीय विश्लेषण**

सांख्यिकीय तंत्रातील विविध ग्राह्यता चाचणीचा विशेषत्वाने उपयोग करण्यात आला. त्या आधारावर निष्कर्ष काढले गेलेत. प्राप्त माहितीवरून वारंवारीता (Frequency), बहुलक (Mode) व मध्यमान (Mean) काढण्यात आले. अभ्यासातील विविध घटक, पडताळण्याकरीता देण्यात आलेले गृहीत प्रमेय आणि वापरण्यात आलेला संशोधनाचा आराखडा लक्षात घेता 'Chi-Square' test वापरून गडचिरोली जिल्ह्यातील आदिम (माडिया) जमातीच्या लोकांचा आर्थिक व सामाजिक समस्यांचा अभ्यास करण्यात आला.

**३.० माडिया जमातीची सामाजिक स्थिती**

**३.१ शैक्षणिक स्थिती**

**तक्ता क्र. १**: गडचिरोली जिल्ह्यातील माडिया जमातीच्या लोकांची शैक्षणिक योग्यता

| अ.क्र. | शिक्षण | कुटुंबांची संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | प्राथमिक (१ ते ५) | ९४ | १३.४ |
| २ | माध्यमिक (६ ते १०) | ६५ | ९.३ |
| ३ | उच्च माध्यमिक (११ ते १२ | ५८ | ८.३ |
| ४ | महाविद्यालयीन | ८३ | ११.९ |
| ५ | अशिक्षित | ४०० | ५७.१ |
| | **एकूण** | **७००** | **१००.०** |

स्त्रोत: सर्वेक्षणाची प्राथमिक आकडेवारी

वरील तक्ता क्र. १ मध्ये गडचिरोली जिल्ह्यातील शैक्षणिक माहिती दर्शविण्यात आली असून स्वातंत्र्यप्राप्तीनंतर या भागामध्ये शिक्षणाचा प्रसार फारशा प्रमाणात होऊ शकला नाही त्यामुळे या भागात सर्वात जास्त अशिक्षीतांची संख्या असून त्यांचे प्रमाण ५७.१ टक्के आहे. उच्च माध्यमिक शिक्षण घेणाऱ्याचे प्रमाण ८.३ टक्के असून सर्वात अधिक शिक्षण घेणाऱ्यांचे प्रमाण प्राथमिक शिक्षणामधे आढळून आले असून त्यांची संख्या ९४ असून त्यांचे प्रमाण १३.४ टक्के सर्वात अधिक आहे.

**३.२ सामाजिक मातृभाषा**

**तक्ता क्र. २**: गडचिरोली जिल्ह्यातील माडिया जमातीच्या लोकांची सामाजिक मातृभाषा

| अ.क्र. | मातृभाषा | कुटुंबाची संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | माडिया | ६१० | ८७ |
| २ | मराठी | ६० | ९.० |
| ३ | इतर | ३० | ४.० |
| | **एकूण** | ७०० | १००.० |

स्त्रोत: सर्वेक्षणाच्या प्राथमिक आकडेवारीवरून

वरील तक्ता क्र. २ मध्ये माडिया समाजाच्या मातृभाषेविषयी माहिती दर्शविण्यात आली असून माडिया गोंडी मातृभाषा असणाऱ्या कुटुंबाची संख्या ६१० असून ९०.० सर्वात अधिक आहे. याचबरोबर महाराष्ट्र शासनाच्या अनेक

योजना मराठी भाषेमधूनच प्रसिध्द होत असल्यामुळे शिवाय शासनाच्या शाळेमधून मराठीचे ज्ञान प्राप्त होत असल्यामुळे सुशिक्षित माडिया मराठी भाषेमध्ये संवाद साधत असतात अशा कुटुंबाची संख्या ९० असून त्यांचे प्रमाण १०.० टक्के आहे. तर इतर भाषा हल्बी, तेलगू, छत्तीसगडी, बंगाली इत्यादी भाषा बोलणाऱ्यांची संख्या ४० असून त्यांचे प्रमाण ३.४ टक्के असल्याचे आढळून आले आहे. याबरोबरच हिंदी भाषिकांची संख्या सर्वात कमी ६ असून त्यांचे प्रमाण ०.९० टक्के आढळून आले आहे. यावरून अजूनही या भागात माडिया गोंडी भाषेचे प्रभुत्व असल्याचे आढळून आले आहे.

### ३.३ कुटुंबातील एकूण सदस्य संख्या

**तक्ता क्र. ३**: गडचिरोली जिल्ह्यातील माडिया जमातीच्या कुटुंबातील एकूण सदस्य संख्या

| अ.क्र. | सदस्य संख्या एकूण | उत्तरदात्यांची संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | १ ते ४ | २५२ | ३६ |
| २ | ५ ते ८ | ३५९ | ५१.३ |
| ३ | ९ ते ११ | ८३ | ११.९ |
| ४ | १२ व त्यापेक्षा अधिक | ६ | ०.९ |
| | **एकूण** | ७०० | १००.० |

स्त्रोत: सर्वेक्षणाच्या प्राथमिक आकडेवारीवरून

वरील तक्ता क्र. ३ मध्ये गडचिरोली जिल्ह्यातील कुटुंबाच्या एकूण सदस्य संख्येसंबंधी माहिती दर्शविण्यात आली आहे. तक्यातील आकडेवारीनुसार शासनाच्या हम दो हमारे दो या म्हणीचा फारसा उपयोग या कुटुंबावर झालेला आढळून येत नाही या भागामध्ये अजूनही आदिवासींमध्ये शिक्षणाचा प्रसार न झाल्यामुळे त्यांच्यामध्ये निरक्षरतेचे प्रमाण अधिक आहे. त्यामुळे जैविक शास्त्रानुसार त्यांच्यात प्रजनन शक्ती अधिक राहून त्यांच्या कुटुंबाचा आकार सुध्दा अधिक राहिला आहे. परिणामत: ५ ते ८ सदस्य संख्या असणाऱ्या कुटुंबाची संख्या ३५९ सर्वाधिक असून त्यांचे प्रमाण ५१.३ असल्याचे दिसून येते. त्याखालोखालल १ ते ४ सदस्य संख्या असणाऱ्या कुटुंबाची संख्या २५२ आढळून आली असून त्यांचे प्रमाण ३६ टक्के आहे. परंतु कुटुंबाची संख्या १२ किंवा त्यापेक्षा अधिक असणाऱ्या कुटुंबाचे प्रमाण ०.०.९ टक्के सर्वात कमी असून यांच्यात शिक्षणाच्या प्रसाराबरोबर राहणीमानाचा दर्जा वाढत असून लोकसंख्या वाढीचा दर कमी होत आहे. परिणामत: पुढील काळात कुटुंबाचा आकार मर्यादित करण्याकरिता प्रत्येक आदिवासी कुटुंब प्रयत्न करीत असल्याचे आढळून आले आहे.

### ३.४ कुटूंबाचा प्रकार

**तक्ता क्र. ४**: गडचिरोली जिल्ह्यातील माडिया जमातीच्या कुटुंबाचा प्रकार

| अ.क्र. | कुटूंबाचा प्रकार | कुटुंबाची संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | संयुक्त | ३०५ | ४३.६ |
| २ | विभक्त | ३९५ | ५६.४ |
| | **एकूण** | ७०० | १००.० |

स्त्रोत: सर्वेक्षणाच्या प्राथमिक आकडेवारीवरून

वरील तक्ता क्र. ४ मध्ये माडियांचे संयुक्त व विभक्त कुटुंब दर्शविण्यात आले आहे. माडियांची कौटुंबिक स्थिती ही सहकार्याची आहे. त्यामुळे त्यांच्या कुटुंबात घरामधील म्हाताऱ्यापासून तर लहान मुलापर्यंत सर्वांचा समावेश होत असतात. त्यामुळे त्यांचा प्रगत भागातील जनतेबरोबर संपर्क येऊन सुध्दा आजच्या आधुनिक काळात ३०५ कुटुंबे संयुक्त पध्दतीची असून त्यांचे प्रमाण ४३.६ टक्के आहे. तर ज्या कुटुंबाचा संपर्क अधिक प्रगत समाजाबरोबर आहे शिवाय त्यांच्या कुटुंबामधील सदस्यांना शासकीय नोकरी प्राप्त झाली आहे. अशा कुटुंबाचे विभाजन होऊन त्यामधून विभक्त कुटुंबे निर्माण झाली आहे त्यांची संख्या दिवसेंदिवस वाढत असून ३९५ कुटुंबे अशाप्रकारे आढळून आले असून त्यांचे प्रमाण ५६.४ टक्के आहे.

**३.५ कुटूंब पद्धतीसंबंधी माहिती**

**तक्ता क्र. ५**: गडचिरोली जिल्ह्यातील माडिया जमातीच्या परिवारातील कुटुंब पध्दती

| अ.क्र. | परिवारातील कुटूंब पद्धतीसंबंधी | कुटुंबांची संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | पितृसत्ताक | ६८३ | ९७.६ |
| २ | मातृसत्ताक | १७ | २.४ |
| | **एकूण** | ७०० | १००.० |

स्रोत: सर्वेक्षणाच्या प्राथमिक आकडेवारीवरून

वरील तक्ता क्र. ५ मध्ये गडचिरोली जिल्ह्यातील कुटुंबाच्या बाबतची माहिती दर्शविण्यात आली असून दर्शविलेल्या माहितीनुसार ९७.६ टक्के कुटुंब पध्दती पितृसत्ताक असून २.४ टक्के कुटुंब पध्दती मातृसत्ताक असल्याचे आढळले. वरील माहितीवरून असे निदर्शनास येते की कुटुंबात प्रमुख वडिल असतो. तो संपूर्ण घराचा सांभाळ करतो. कुटुंबातील कुठल्याही कार्यामध्ये तो समोर असतो. पुढे त्याला निर्माण झालेली अपत्य (मुलगा) ही त्या घटाचा व्यवहार पाहात असतात. अशी ही पितृसत्ताक पध्दती या जमातीत आहे. असे वरील सारणीवरून आपल्याला आढळून येते.

**३.६ कुटूंबातील काम करणारे सदस्य**

**तक्ता क्र. ६**: गडचिरोली जिल्ह्यातील माडिया जमातीच्या कुटुंबातील काम करणारे सदस्य

| अ.क्र. | कुटूंबातील काम करणारे सदस्य | कुटुंबाची संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | १ ते २ | २८९ | ४१.३ |
| २ | ३ ते ४ | २६३ | ३७.६ |
| ३ | ५ ते ७ | १३० | १८.६ |
| ४ | ७ पेक्षा जास्त | १८ | २.६ |
| | **एकूण** | ७०० | १००.० |

स्रोत: सर्वेक्षणाच्या प्राथमिक आकडेवारीवरून

वरील तक्ता क्र. ६ मध्ये गडचिरोली जिल्ह्यातील ७०० कुटुंबापैकी १ ते २ सदस्यसंख्या कुटुंबातील काम करणाऱ्याची संख्या २८९ असून त्यांचे प्रमाण ४१.३ टक्के सर्वाधिक असल्याचे आढळून आले आहे. कारण या समाजाचे वास्तव्य ग्रामीण भागात असून घरामधील पती व पत्नी हे दोघेही सदस्य शेतीचे व इतर काम करीत असतात त्यामुळे अशा कुटुंबाची संख्या अधिक आढळून येते. या खालोखाल ३ ते ४ सदस्य काम करणाऱ्या कुटूंबाची संख्या असून त्यांचे प्रमाण ३७.६० टक्के आहे. परंतु ७ पेक्षा अधिक सदस्य काम करणाऱ्या सदस्यांची संख्या मात्र १८ असून त्यांचे प्रमाण २.६ टक्के सर्वात कमी आहे.

**माडियांची आर्थिक स्थिती:**

**३.७ माडियांच्या व्यवसाय स्वरूपासंबंधी माहिती**

**तक्ता क्र. ७**: गडचिरोली जिल्ह्यातील माडिया जमातीच्या व्यवसायाच्या स्वरूपासंबंधी माहिती

| अ.क्र. | व्यवसाय | कुटुंबाची संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | पारंपारिक | ६७२ | ९६.० |
| २ | आधुनिक | २८ | ४.० |
| | **एकूण** | ७०० | १००.० |

स्रोत: सर्वेक्षणाच्या प्राथमिक आकडेवारीवरून

वरील तक्ता क्र. ७ मध्ये गडचिरोली जिल्ह्यातील माडिया कुटुंबातील व्यवसायाच्या स्वरूपासंबंधी माहिती दर्शविण्यात आली असून तक्तात दर्शविलेल्या माहितीनुसार ९६ टक्के शेतकरी पारंपारिक व्यवसाय करीत असून ४ टक्के शेतकरी आधुनिक व्यवसाय करीत असल्याचे आढळले. बहुतांश शेतकरी हे अजूनही आर्थिक दृष्टया कमकुवत आहेत.

तसेच त्यांना नवीन तंत्रज्ञानाचे पाहिजे तेवढया प्रमाणात ज्ञान नाही. नविन गोष्टी स्विकारण्यास माडिया लोक तयार नाही त्यामुळे ते परंपरागत पद्धतीने शेती करतांना दिसून येतात. काही शेतकरी हे शहराच्या संपर्कात येत आहेत. त्यांना शेतीबाबत थोडीफार माहिती होत आहे. त्यामुळे माडिया शेतकरी आधुनिक पद्धतीचा वापर करून शेतीमध्ये उत्पादन घेतांना आढळून येतात.

**३.८ उदरनिर्वाहाची साधन**

**तक्ता क्र. ८**: गडचिरोली जिल्ह्यातील माडिया जमातीच्या जिल्ह्यातील लोकांची उदरनिर्वाहाचे साधन

| अ.क्र. | उत्पन्नाचे साधनासंबंधी | कुटुंबाची संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | शेती | ६८२ | ९७.४ |
| २ | नोकरी | ३ | ०.४ |
| ३ | इतर | ६ | ०.९ |
| ४ | शेती आणि इतर | ६ | १.३ |
| | **एकूण** | ७०० | **१००.०** |

स्त्रोत: सर्वेक्षणाच्या प्राथमिक आकडेवारीवरून

वरील तक्ता क्र. ८ मध्ये गडचिरोली जिल्ह्यातील कुटुंबाच्या उदरनिर्वाहाच्या साधनासंबंधी माहिती दर्शविण्यात आली आहे. तक्तात दर्शविलेल्या माहितीनुसार ९७.४ टक्के कुटुंबाचे मुख्य उदनिर्वाहाचे साधन शेती असून ०.४ टक्के कुटुंबाचे उदनिर्वाहाचे स्त्रोत नोकरी असल्याचे आढळले. तसेच ०.९ टक्के कुटुंबाचे उदनिर्वाहाचे साधन इतर प्रकारचे असून १.३ टक्के कुटुंबाचे उदनिर्वाहाचे साधन शेती आणि इतर असल्याचे आढळले.

**३.९ माडियांचा पुरक व्यवसाय**

**तक्ता क्र. ९**: गडचिरोली जिल्ह्यातील माडिया जमातीच्या पुरक व्यवसाया बाबतची माहिती

| अ.क्र. | पुरक व्यवसाय प्रकार | उत्तरदात्यांची संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | कुक्कूटपालन | २७६ | |
| २ | दुग्धपालन | ०० | |
| ३ | शेळीपालन | १०२ | |
| ४ | इतर | ३९ | |
| | नाही | ३२५ | |

स्त्रोत: सर्वेक्षणाच्या प्राथमिक आकडेवारीवरून

वरील तक्ता क्र. ९ मध्ये गडचिरोली जिल्ह्यातील माडिया शेतकरी शेती व्यतिरिक्त इतर पुरक व्यवसाय करीत असल्याच्या प्रकारासंबंधी माहिती दर्शविण्यात आली आहे. तक्तात दर्शविलेल्या माहितीनुसार ३९.४ टक्के माडिया शेतकरी शेती व्यतिरिक्त कुक्कूटपालनाचा व्यवसाय करीत असून १४.६ टक्के माडिया शेतकरी शेती व्यतिरिक्त शेळीपालनाचा व्यवसाय करीत असल्याचे आढळले. तसेच ५.६ टक्के माडिया शेतकरी शेती व्यतिरिक्त इतर व्यवसाय करीत असून ४६.४ टक्के शेतकरी शेती व्यतिरिक्त इतर व्यवसाय करीत नसल्याचे आढळून आले आहे.

**३.१० कुटूंबाचे एकूण वार्षिक उत्पन्न**

**तक्ता क्र. १०**: गडचिरोली जिल्ह्यातील माडिया जमातीच्या कुटुंबाचे एकूण वार्षिक उत्पन्न

| अ.क्र. | कुटूंबाचे एकूण वार्षिक उत्पन्न | उत्तरदात्यांची संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | ५ ते ५० हजार | ६८८ | ९८.३ |
| २ | ५१ हजार ते १ लाख | ६ | ०.९ |
| ३ | ५ ते १० लाख | ६ | ०.९ |
| | **एकूण** | ७०० | **१००.०** |

स्त्रोत: सर्वेक्षणाच्या प्राथमिक आकडेवारीवरून

वरील तक्ता क्र. १० मध्ये गडचिरोली जिल्ह्यातील माडिया कुटुंबातील एकूण वार्षिक उत्पन्नासंबंधी माहिती दर्शविण्यात आली आहे. तक्तात दर्शविलेल्या माहितीनुसार ९८.३ टक्के माडिया कुटुंबातील वार्षिक उत्पन्न ५ ते ५० हजार रूपयाच्या दरम्यान असून त्यांचे प्रमाण सर्वाधिक आहे किंवा त्यापेक्षा आधिक उत्पन्न असणाऱ्या ५१ हजार ते १ लाख असल्याचे दिसून येते. तसेच ०.९ टक्के असल्याचे दिसून येते.

**३.११ उत्पन्नापासून गरजपूर्ती**

**तक्ता क्र. ११**: गडचिरोली जिल्ह्यातील माडिया जमातीतील लोकांचे उत्पन्नापासून समाधान

| अ.क्र. | प्रतिक्रिया | कुटुंबाची संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | पुरेसे उत्पन्न असणे | १८९ | २७.० |
| २ | पुरेसे उत्पन्न नसणे | ५११ | ७३.० |
| | **एकूण** | ७०० | १००.० |

स्त्रोत: सर्वेक्षणाच्या प्राथमिक आकडेवारीवरून

वरील तक्ता क्र. ११ मध्ये गडचिरोली जिल्ह्यातील कुटुंबांना कुटुंबातील वार्षिक उत्पन्न पुरेसे वाटत नसण्यासंबंधी माहिती दर्शविण्यात आली आहे. तक्तात दर्शविलेल्या माहितीनुसार ७३ टक्के कुटुंबांना त्यांचे कुटुंबातील वार्षिक उत्पन्न पुरेसे वाटत नसून २७ टक्के कुटुंबांना त्यांच्या कुटुंबातील वार्षिक उत्पन्न पुरेसे वाटत असल्याचे निर्दशनास आले.

**निष्कर्ष**:

- प्राप्त परिणामांच्या सांख्यिकीय विश्लेषणाच्या आधारे असे निदर्शनास येते की, अध्ययन क्षेत्रातील बहुतांश माडिया जमातीतील लोकांनी प्राथमिक शिक्षण प्राप्त केले आहे.
- प्राप्त परिणामांच्या सांख्यिकीय विश्लेषणाच्या आधारे असे निदर्शनास येते की, अध्ययन क्षेत्रातील बहुतांश माडिया जमातीतील लोकांची मातृभाषा माडिया आहे.
- प्राप्त परिणामांच्या सांख्यिकीय विश्लेषणाच्या आधारे असे निदर्शनास येते की, अध्ययन क्षेत्रातील बहुतांश माडिया जमातीतीच्या कुटूंबात एकूण ५ ते ८ सदस्य आहेत.
- प्राप्त परिणामांच्या सांख्यिकीय विश्लेषणाच्या आधारे असे निदर्शनास येते की, अध्ययन क्षेत्रातील बहुतांश माडिया जमातीतील लोक विभक्त कुटुंबात राहतात.
- प्राप्त परिणामांच्या सांख्यिकीय विश्लेषणाच्या आधारे असे निदर्शनास येते की, अध्ययन क्षेत्रातील बहुतांश माडिया जमातीच्या परिवारातील कुटुंबपध्दती पितृसत्ताक आहे.
- प्राप्त परिणामांच्या सांख्यिकीय विश्लेषणाच्या आधारे असे निदर्शनास येते की, अध्ययन क्षेत्रातील बहुतांश माडिया जमातीच्या कुटुंबात एक ते दोन काम करणारे सदस्य आहेत.
- प्राप्त परिणामांच्या सांख्यिकीय विश्लेषणाच्या आधारे असे निदर्शनास येते की, अध्ययन क्षेत्रातील बहुतांश माडिया जमातीतीचे व्यसाय पारंपारिक स्वरूपाचे आहेत.
- माडिया जमातीचा शेती हा मुख्य व्यवसाय आहे. आजही इतर कोणत्याही व्यवसायापेक्षा ही जमात शेतीवरच जास्त अवलंबून असल्याचे आढळून येते. गावागावात शाळा असल्याने आणि त्यांना शिक्षणासाठी शासनाने विविध सोई उपलब्ध करून दिल्यामुळे शिक्षण घेण्याच्या प्रमाणात वाढ झाली आहे. पण उच्च शिक्षण घेऊन नोकरी करणारा वर्ग फारच कमी आहे.
- प्राप्त परिणामांच्या सांख्यिकीय विश्लेषणाच्या आधारे असे निदर्शनास येते की, अध्ययन क्षेत्रातील बहुतांश उत्तरदाते शेती व्यतिरिक्त इतर व्यवसाय म्हणून कुक्कूटपालन करतात.
- प्राप्त परिणामांच्या सांख्यिकीय विश्लेषणाच्या आधारे असे निदर्शनास येते की, अध्ययन क्षेत्रातील बहुतांश उत्तरदात्यांच्या कुटुंबातील एकूण वार्षिक उत्पन्न ५ ते ५० हजार असल्याचे आढळून येते.

- प्राप्त परिणामांच्या सांख्यिकीय विश्लेषणाच्या आधारे असे निदर्शनास येते की, अध्ययन क्षेत्रातील बहुतांश कुटुंबांना त्यांच्या कुटुंबातील वार्षिक उत्पन्न पुरेसे वाटत नाही. अशावेळी त्यांच्या उत्पन्नात वाढ होण्याकरीता शासनाने योग्य सहकार्य करणे आवश्यक आहे.

## आधारग्रंथ सूची

१) देवगांवकर शै. (१९९९). 'वैदर्भिय आदिवासी जीवन आणि संस्कृती', श्री प्रकाशन, नागपूर
२) लोटे रा. ज. (२००४). आदिवासी समाजाचे समाजशास्त्र पिंपळापुरे अँड क. पब्लिशर्स नागपूर, प्र. आ.
३) नायडू पी. आर.,'भारत में. आदिवासी विकास की समस्याएँ, राधा पब्लिकेशन, नई दिल्ली.
४) गारे गोविंद. (२००३). 'नक्षलवादी आणि आदिवासी', सुगावा प्रकाशन, पुणे.
५) डोहणे एस. एम. (२०११)'गडचिरोली जिल्ह्यातील समाजिक समस्यांचा सोडवणूकीत स्वयंसेवी संस्थाचे योगदान (पीएच.डी. शोधप्रबंध, नागपूर विद्यापीठ –२०११)
६) नलावडे पंडित (२००८). 'विकासाच्या मार्गावर आदिवासी', योजना, खंड अंक २.
७) तुमराम वि. (२०११). "आदिम आणि आधुनिक", लोकराज्य, डिसेंबर, पृष्ठ क्र. ८४.
८) तेगमपुरे मा. (२०११). 'आदिवासी विकास : एक दूसरी बाजू', अर्थसंवाद, खंड ३५, अंक तिसरा, ऑक्टोंबर २०११.